पुण्य नगरी

सोलापूर । शुक्रवार, २७ मे २०१६

३

# नागरी बँकांनी आधुनिकरणाची कास धरावी

## जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड यांचे आवाहन, बँक्स असोसिएनच्यावतीने पुरस्कारांचे वितरण

सोलापूर / प्रतिनिधी

आधुनिकरणामुळे जगभरातील बँकींग क्षेत्रात प्रचंड मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. स्पर्धेच्या काळात टिकून राहण्यासाठी नागरीकांना जल्द व सुलभ सेवा देण्यासाठी नागरी बँकांनी आधुनिकरणाची कास धरावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक बी. टी. लावंड यांनी केले. सोलापूर जिल्हा नागरी बँक्स को-ऑफ असोसिएनच्यावतीने देण्यात येणाऱ्या आदर्श बँक व आदर्श पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते.

यावेळी माजी आमदार सुधाकरपंत परिचारक, आ. बबनदादा शिंदे, असोसिएनचे अध्यक्ष राज मणियार, जनता बँकेचे अध्यक्ष किशोर देशपांडे, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा प्रमुख अस्मिता गायकवाड, काँग्रेस नेते कल्याणराव काळे, असोसिएनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश सोनटक्के, उपाध्यक्ष राजगोपाल झंवर, संचालक मोहन दाते आदी उपस्थित होते.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

दि. लक्ष्मी बँक, सोलापूर, माढेश्वरी अर्बन बँक, माढा, सद्गुरु गहिनाथ बँक, अकलूज, कृषीसेवा बँक, कोळे, शरद नागरी बँक, सोलापूर, शिवशक्ती बँक, बार्शी, विद्यानंद बँक, सोलापूर, मनोरमा बँक, सोलापूर, विकास बँक, सोलापूर, सोलापूर जनता सहकारी बँक, सोलापूर, दि. पंढरपूर अर्बन बँक, पंढरपूर

लावंड पुढे म्हणाले, जिल्ह्यात एकूण ३४ नागरी बँका आहेत. त्यापैकी तब्बल ३२ बँकांचे कार्य उत्कृष्ठ आहे. त्यामुळे या ३२ बँका पुरस्कारास पात्र आहेत. जिल्ह्यातील नागरी बँकां व पतसंस्थांमध्ये जवळपास १० हजार कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. राष्ट्रीयकृत व नागरी बँकांतील ठेवींचा आकडा २२ हजार कोटींच्या पुढे आहे. त्यामुळे सोलापूर जिल्हा सेव्हींग करण्यात देशात पहिला असल्याचे दिसून येते. त्याला येथील लोकांची श्रमशक्ती कारणीभूत आहे. रिझर्व्ह बँक व राज्य शासनाच्या दुहेरी नियमांना सामोरे जावून काम करावे लागत आहे. तरीदेखील नागरी बँकांचे कार्य कौतुकास्पद आहे. नागरी बँकांना सहकार खात्याकडे पूर्णपणे सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

सुधाकर परिचारक म्हणाले, चांगले काम करणारे बँकांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन देण्याचे चांगले काम बँक्स असोसिएनच्यावतीने केला जात आहे. सहकारी बँकांना आरबीआय चे नियम आणि एनपीमध्ये टिकून काम करणे अवघड आहे. अर्बन बँका चालविताना पूर्वी ठेवी मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. आज ठेवी मोठ्याप्रमाणात मिळत आहेत पण चांगले कर्जदार मिळणे कठीण झाले आहे. अडचणीच्या काळातही नागरी बँका स्पर्धेत राहून लोकांना ग्राहकाभिमुख सेवा देत आहेत.



जिल्हा नागरी बँक्स असोसिएनच्यावतीने उत्कृष्ठ कामगिरीबद्दल माढेश्वरी अर्बन बँकेचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना आ. बबनराव शिंदे. याप्रसंगी सुधाकर परिचारक, बी.टी. लावंड, कल्याणराव काळे, राज मनियार, मोहन दाते आदी.